| ग्रामपंचायत तरंदळे ता.कणकवली जि.सिंधुदुर्ग |
|---|
| ग्रा.प.जा.क्र. २१० /२०२६ |
| दिनांक :- २८/८/२०२६ |
| ✉:- vptarandale@gmail.com |

# ग्रामपंचायत कर्मचारी पद भरती- २०२६

## जाहिरात क्रमांक :- १/२०२६ दिनांक :- २८/०८/२०२६

**संदर्भ :-**

1. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम 1959 मधील कलम 61
2. मुंबई ग्रामपंचायत नोकरांबाबत (सेवेच्या शर्ती) नियम, 1960
3. ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्र. ग्रापक 2005/प्र.क्र. 14/पंरा-5 दि. 22 मार्च 2005
4. ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र. व्हीपीएम-2008/प्र.क्र. 11/पंरा-3, 05 ऑगष्ट 2008
5. ग्राम विकास विभाग शासन परिपत्रक क्र. व्हीपीएम-1013/प्र.क्र. 60/पंरा-3 दि. 08 जुलै 2013
6. शासन निर्णय क्र. प्रानिमं 1215/(प्र.क्र.109/15)/13-अ दि. 5 आक्टोबर, 2015
7. ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्र. व्हीपीएम-2018/प्र.क्र. 397/पं.रा.-3 दि. 17 सप्टेंबर 2018
8. ग्रामपंचायत कार्यालय, तरंदळे ची मासिक सभा दि. 25/8/2026

**तरंदळे गावातील** सर्व ग्रामस्थांना सूचित करण्यात येते की, शासन निर्णयानूसार आकृतीबंधाप्रमाणे आपल्या ग्रामपंचायत कार्यालयासाठी शिपाई पद मंजूर असून, हे पद रिक्त आहे. त्यामुळे दि. २५/८/२०२६ रोजी झालेल्या मासिक सभेतील चर्चेनूसार महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ मधील कलम ६१ नूसार ग्रा.प.शिपाई पदाच्या निवडीसाठी ईच्छूकांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. तरी खालील अटी,शर्तीच्या निकषात बसणाऱ्या ईच्छूकांनी आपले अर्ज विहित कालावधीत ग्रामपंचायत कार्यालयात **दि.९/९/२०२६ रोजी पर्यंत** समक्ष आणून द्यावेत, यानंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

❖ **अर्ज करण्याची पध्दत :-**

| | |
|---|---|
| 1. | प्रस्तूत भरती करिता (ऑफलाईन पध्दतीने )अर्ज स्विकारण्यात येत आहेत. |
| 2. | इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज हे ग्रामपंचायत कडील घेण्यात आलेल्या विहित नमून्यात व विहित कालावधीतच सर्व आवश्यक त्या कागदपत्राच्या सत्य प्रतीसह ग्रामपंचायत कार्यालयात जमा करावेत. |
| 3. | उपरोक्त पदासाठी अर्ज हे ग्रामपंचायत कार्यालय येथे उपलब्ध करण्यात आले आहे. |
| 4. | अर्ज हे दिनांक **२८/८/२०२६** रोजी पासून ते दि. **९/९/२०२६** रोजी सांयकाळी **०५:०० वाजेपर्यंत** स्विकारण्यात येतील. |
| 5. | विहित कालावधीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. |

❖ **फॉर्म शुल्क :-**

| | | |
|---|---|---|
| 1. | शिपाई पदासाठी फॉर्म फी | **रू. २००/-** |

या ग्रा.प.शिपाई भरती प्रक्रिया संदर्भातील सविस्तर जाहिरात ग्रामपंचायत कार्यालय तरंदळे येथिल सुचना फलकावर चिटकवलेली असून उमेदवारांनी जाहिरातीत नमूद संपुर्ण माहिती काळजीपूर्वक वाचून अर्ज सादर करावेत. तसेच भरती प्रक्रिया संबंधित प्रक्रियेसाठी <u>आवश्यक व अद्यावत माहितीसाठी नियमितपणे नोटीस बोर्ड वर पाहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.</u>

भरती प्रक्रिया स्थगित करणे किंवा रद्द करणे, तसेच भरती प्रक्रिया संदर्भात वाद, तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकरण तथा मा. सरपंच ग्रामपंचायत तरंदळे ता.कणकवली यांना असतील.

ग्रामपंचायत कार्यालय तरंदळे ता. कणकवली अंतर्गत कर्मचारी भरती -२०२६ अन्वये भरावयाच्या पदांचे नाव, रिक्त पद संख्या आरक्षण इत्यादींचा एकत्रित तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | रिक्त पदाचे नाव | रिक्त पदांची संख्या | आरक्षण |
|---|---|---|---|
| 1 | **शिपाई (वर्ग-४)** | **०१** | **पुरुष प्रवर्गासाठी आरक्षित** |

❖ **पदनिहाय आवश्यक शैक्षणिक अर्हता**

| अ.क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|
| 1 | शिपाई (वर्ग-4) | १) १२ वी (H.H.C.) परिक्षा उतीर्ण प्रमाणपत्र .<br>२) MS-CIT उतीर्ण प्रमाणपत्र. |

❖ **वरील सर्व पदांसाठी आवश्यक सामाईक अर्हता खालील प्रमाणे असेल.**

| अ.क्र. | सामाईक अर्हता | तपशिल |
|---|---|---|
| 1 | लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र | महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम, 2005 मधील तरतूदीनूसार शासकिय भरतीमध्ये विहित नमून्यातील प्रतिज्ञापत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.<br>प्रतिज्ञापत्रात नमूद केल्यानूसार हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक 28 मार्च 2006 व तद्नंतर जन्माला आलेल्या, अपत्यामुळे उमेदवार शासकिय सेवेच्या नियुक्तीसाठी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल. |

❖ **सर्वसाधारण सूचना :-**

उमेदवारांनी अर्ज सादर करीत असताना अर्जासोबत कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रती अर्जा सोबत जोडाव्यात. अर्जासोबत मूळ कागदपत्रे सादर करण्याची आवश्यकता नाही. कागदपत्र पडताळणीच्या प्रक्रियेवेळी पदाकरिता आवश्यक मूळ कागदपत्रांची पडताळणी करण्यात येईल.

| **सर्व साधारण अटी व शर्ती** | **शेरा** |
|---|---|
| अ) उमेदवार हा गावाचा स्थानिक रहिवासी असावा | निवासाचा पुरावा आवश्यक |

❖ **वयोमर्यादा** :-

**1.** उमेदवाराने अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास अर्ज केलेल्या पदांकरीता विहित वयोमर्यादा आणि आवश्यक किमान शैक्षणिक अर्हता धारण करणे आवश्यक राहील.

**2.** अर्ज सादर करण्याचे अंतिम दिनांकास **<u>उमेदवारांचे वय १८ वर्ष पेक्षा कमी नसावे</u>**.

**3.** अर्ज सादर करण्याचे अंतिम दिनांकास **<u>उमेदवारांचे वय २८ वर्ष पेक्षा जास्त नसावे</u>**.

❖ **अर्ज भरण्याची कार्यपध्दती व सूचना :-**

| | |
|---|---|
| 1. | उमेदवाराने घेतलेल्या विहित नमून्यातच व त्यावर स्वतःच्या हस्ताक्षरात सूवाच्यपणे अर्ज करावा. अर्जासोबत नजिकच्या काळातील कलर पासपोर्ट साइज फोटो चिटकवावा. |
| 2. | अर्जात उमेदवाराचे नाव, वडीलांचे नाव, आडनाव, आईचे नाव, जन्मदिनांक, भ्रमरध्वनी क्रमांक, छायाचित्र (फोटो), स्वाक्षरी ही मूलभूत माहिती आहे. जी उमेदवाराला सविस्तर भरावी लागेल. |
| 3. | पत्ता टाकण्यासाठी उमेदवाराने आपल्या पत्याचा प्रकार नमूद करावा. उदा. कायमस्वरूपी पत्ता, तात्पुरता पत्ता किंवा दोन्ही आणि त्यानूसार आपले गाव, पोस्ट ऑफिस, राज्य, जिल्हा, पिन कोड इ. माहिती अचूक भरावी. |
| 4. | ज्यांच्याकडे आधार कार्ड आहे, त्यांनी तत्संबंधी माहिती भरावी, तसेच उमेदवाराने आधार क्रमांक / आधार नोंदणी क्रमांक या बद्दलची माहिती द्यावी. |
| 5. | शैक्षणिक माहितीच्या जागी उमेदवाराने आपली सविस्तर शैक्षणिक माहिती भरावी. शैक्षणिक पात्रतेमध्ये जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे माहिती देणे अनिवार्य आहे. तसेच पदाच्या अर्हतेनूसार आवश्यक ती शैक्षणिक माहिती देणे आवश्यक आहे. तरच आपणांस त्या पदासाठी अर्ज करता येईल. |
| 6. | उमेदवाराने अर्जासोबत अनूभव दाखला असल्यास पूरावा सोबत जोडावा. |
| 7. | उमेदवाराने अर्जासोबत कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडाव्यात. |
| 8. | अर्जासोबत आधार कार्ड/मतदान कार्ड व रेशन कार्ड झेरोक्स सत्यप्रत जोडावी. |
| 9. | निवडीबाबत सर्व अधिकार हे सरपंच ग्रामपंचायत तरंदळे यांना राहतील. |
| 10. | उमेदवाराने नेमणूकीनंतरच्या अटी व शर्ती मान्य करून त्याचे पालन केले पाहिजे. |
| 11. | उमेदवाराने अर्जासोबतच एका साध्या कागदावर प्रतिज्ञापत्र- मी प्रमाणित करतो की, अर्जात सादर केलेली माहिती खरी आहे. ती खोटी अथवा चूकीची असलेचे आढळून आल्यास मला अपात्र समजून माझ्यावर कारवाई केल्यास मी कोणतीही तक्रार करणार नाही. असे प्रमाणपत्र सादर करावे. |

❖ **महत्वाच्या सूचना :-**

| | |
|---|---|
| 1. | उमेदवाराने भरणा केलेले शुल्क कोणत्याही परिस्थितीमध्ये (अनेकदा अर्ज करणे, अर्ज चूकणे, इत्यादी कारणांसाठी) परत केले जाणार नाही. |

| | |
|---|---|
| 2. | निवडी संबंधात कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास किंवा प्रलोभन दाखविल्यास संबंधित उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल. |
| 3. | निवड प्रक्रिया सूरू झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात नमूद केलेली माहिती / अगर बनावट कागदपत्रे सादर केल्याचे / उमेदवाराने सादर केलेली माहिती वस्तूस्थितीदर्शक नसल्याचे किंवा खरी माहिती दवडून ठेवल्याचे केव्हाही निदर्शनास आल्यास केलेली निवड / नेमणूक रद्द केली जाईल. |
| 4. | अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. |
| 5. | उक्त जाहिरातीमध्ये घोषित केलेल्या पदांकरिता मूळ कागदपत्रांची छाननी अंती व आक्षेप / हरकतींचा विचार करून आवश्यकता भासल्यास तोंडी परीक्षा/मुलाखत घेऊन अंतिम निवड यादी प्रसिध्द करण्यात येईल. |
| 6. | उमेदवाराने अर्जासोबत सर्व कागदपत्रांच्या सत्यप्रती सोबत जोडाव्यात व कागदपत्र छाननीच्या दिवशी सर्व मूळ कागदपत्रे सादर करावीत. |

❖ **विशेष सूचना :-**

| | |
|---|---|
| 1. | वेतन :- शासन निर्णयानूसार वेतन देय राहील. |
| 2. | सदर पदभरतीचे नियम/निकषामध्ये पदभरती पुर्ण होईपर्यंत वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या शासन निर्णय/परिपत्रक/अधिसूचना यानूसार बदल होऊ शकतो. आवश्यकता भासल्यास वेळोवेळी शुद्धीपत्रक नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात येईल. |
| 3. | चारित्र्य-पुर्वचारित्र्य पडताळणी अंती आक्षेपार्ह बाबी आढळून आल्यास संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी/सेवेसाठी पात्र राहणार नाही. तसेच कोणत्याही टप्प्यावर असे उमेदवार अपात्र ठरतील. |
| 4. | निवड झालेल्या उमेदवाराने आवश्यक त्या सर्व प्रमाणपत्र/हमीपत्र इत्यादींची पुर्तता करून देणे आवश्यक राहील. |
| 5. | वरील अटी व शर्ती नियमाव्यतिरिक्त शासनाने व ग्रामपंचायतीने वेळोवळी निर्गमित केलेले आदेश व निर्णय लागू राही. |

❖ **प्रत माहितीस्तव-**

1. ग्रा.प.कार्यालय
2. ग्रामपंचायत नोटीस बोर्ड
3. रेशनधान्य दुकान तरंदळे

सरपंच
ग्रामपंचायत तरंदळे
ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग